International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# नवीन शैक्षणिक धोरण व शिक्षकाची बदलती भूमिका

**डॉ. किर्तीकर वाल्मीक भिमराव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी रात्र महाविदयालय सोलापूर
**Corresponding Author- डॉ. किर्तीकर वाल्मीक भिमराव**
**Email :** kirtikarwalmik@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14614141**

**गोषवारा**

इतिहासाच्या प्राचीन कालखंडापासून भारतीय समाजव्यवस्थेत शिक्षकाला आदराचे, मानाचे स्थान आहे. समाजातील अनेक घटकापैकी शिक्षक हा अत्यंत महत्वाचा व प्रमुख घटक समजला जातो. शिक्षकाकडे संपूर्ण समाज प्राचीन कालखंडापासून 21 व्या शतकापर्यंत आर्दश म्हणून बघत आलेला आहे.

असे असले तरी, प्राचीन कालखंडापेक्षा 21 व्या शतकातील शिक्षकाची भूमिका निश्चितच बदलेली आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे सामाजिक रचनेत अनेक बदल झाले त्यामुळे समाजाकडून शिक्षकांच्या अपेक्षा मोठयाप्रमाणत वाढल्या आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये पूर्वी नव्हती एवढी प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धचा परिणाम म्हणून पालक, विदयार्थी पूर्वीपेक्षा जागरुक झालेले आहेत. म्हणून समाज हा ग्राहक या नात्याने शिक्षण व्यवस्थेकडून गुणत्तेची हमी मागू लागला. म्हणून या एकूण परिस्थितीनुसार शिक्षकांने स्वता: मध्ये बदल घडवून आणणे गरजेचे आहे. तसेच शिक्षकाने आपल्या व्यावासायीकत्तेशी बांधीलकिच्या द्रष्टीकोनातून जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. सदर संशोधन लेखामध्ये नवीन शैक्षणिक धोरण 2020 व शिक्षकाची बदलती भूमिका या विषयाचा संक्षिप्त आढावा संशोधकाने घेतला आहे.

---

**उद्दिष्टे**

1) नवीन शैक्षणिक धोरण 2020 चा अभ्यास करणे
2) नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरुन शिक्षकाच्या बदलत्या भूमिकेचा अभ्यास करणे

**गृहितके**

1) नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षकाची भूमिका ही नवोपक्रमशील मार्गदर्शकाची असल्याचे दिसते.
2) नवीन शैक्षणिक धोरणात सर्व स्तरावरील शिक्षकानी अध्यापनाची नवीन तंत्रे,

कौशल्य इत्यादी बाबतीत अदयावतता आणणे गरजेचे असल्याचे जाणवते.

**संशोधन पध्दती**

सदर संशोधन लेखासाठी संशोधकाने दुय्यम स्त्रोतादवारे उदा संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालीके, साप्ताहिके, वेबसाईटस इत्यादीचा आधार घेवून माहिती संकलीत केली आहे म्हणून सदर संशोधन लेखासाठी ऐतीहासीक, वर्णणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण पार्श्वभूमी**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 -**

कोठारी शिक्षण आयोगाच्या शिफारशी लागू करुन भारताच्या शिक्षण प्रक्रीयेत आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी 1968 मध्ये पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहिर झाले.

राज्यघटनेचा मार्गदर्शक तत्वामधील कलम 45 ची अमलबजावणी शिक्षक, प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे, त्रीभाषा सुत्राचा स्विकार, सर्वाना शिक्षणाच्या समान संधीची हमी, प्रौढ साक्षरता व अर्धवेळ पत्रादवारे शिक्षण तसेच 10+2+3 ही एक

सारखी संरचना संपूर्ण देशभर स्विकारने उपरोक्त महत्वपूर्ण वैशिष्टयांसह पहिले राष्ट्रीय धोरण संपूर्ण् देशभर लागू करण्यात आले.

**दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986**

प्राथमिक शिक्षणांतील राष्ट्रीय स्तरावरील नावनोंदणी, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठीचे विविध प्रोत्सहानपर कार्यक्रम उदा. मध्यान्ह भोजन योजना, गुणवत्ता विकास, संगणक कौशल्याचे शिक्षण व समाजातील भेदभाव, विषमता दुर करणे इत्यादीवर या धोरणात काम करण्यात आले.

**86 वी घटना दुरुस्ती 2002**

अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुढाकाराने ही 86 वी घटनादुरुस्ती 2002 ला करण्यात आली या घटनादुरुस्तीने 6 ते 14 वर्ष वयोगटातील बालकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. 6 वर्षापेक्षा कमी वयाच्या मुंलाना बालपणातील अनौपचारीक शिक्षण व काळजी इ. शिक्षणाची तरतुद करण्यात आली. तसेच राज्य घटनेतील अनुच्छेद-51 म्हणजेच मुलभूत अधिकारामध्ये दुरुस्ती करण्यात येऊन पालकांनी आपल्या मुलाला शिक्षणाची संधी उपलब्ध् करुन देण्यासाठी प्रयत्न करणे याबाबतची तरतुद करण्यात आली.

**शिक्षणाचा अधिकार कायदा 2009**

या कायदयाने 6 ते 14 वर्ष वयोगटातील सर्व बालकाना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले. तसेच प्राथमिक शिक्षणाचा अधिकार मुलभूत अधिकार म्हणून मान्य करण्यात आला. शिक्षण अधिकार कायद्याच्या शीर्षकामध्ये 'मुक्त आणि अनिवार्य' हे शब्द समाविष्ट करण्यात आले. तसेच भारतातील 6 ते 14 वर्ष वयोगटातील कोणतेही मुल शाळेचे शुल्क भरु शकत नाही म्हणून शालाबाहय राहू शकत नाही. याबाबतच्या सर्व तरतुदी राज्यघटनेच्या 21A मध्ये समाविष्ट करुन बालकांच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारवर टाकण्यात आली आहे.

**शिक्षकाची बदलती भूमिका**

**1) व्यावसायिक बांधिलकी**

बदलत्या काळानुसार अनेक सामाजिक समस्या निर्माण होताना दिसून येत आहे. एकीकडे समाजात फसवणूक, गैरप्रकार, लुबाडणुक सुरू असताना बदलत्या काळात शिक्षकाने शिक्षकी पेशावरील निष्ठा, श्रध्दा, प्रामणिकपणा, एकवाक्यता, सत्यता व चारीत्र्य या मुल्याशी कायमस्वरुपी बांधिलकी ठेवणे गरजेचे आहे तसेच ज्या संघटनेसोबत आपण एका विशिष्ट ध्येयाने जोडले गेलेलो आहोत त्या संघटनात्मक पातळीवर शिक्षकाचे वर्तन आदर्श असले पाहिजे.

**2) समन्वयकाची विशेष भूमिका**

विद्यार्थ्याच्या सर्वागिण विकासासाठी शिक्षकाने विविध ज्ञानशाखामध्ये समन्वय साधला पाहिजे ज्यामुळे विविध ज्ञानशाखामधील लिखीत व अलिखीत साहित्याचा वापर करुन त्याला अध्यापन करता येईल व त्याने अध्यापण केलेले ज्ञान कायम स्वरुपी टिकेल.

**3) समाज व विद्यार्थ्यांचा समुपदेशक व मार्गदर्शक**

वर्गात विविध क्षमता असणारे विद्यार्थ्री शिकत असतात त्यांच्या आवडीनिवडी, क्षमता लक्षात घेवून पालकांशी चर्चा करुन विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन करणारा शिक्षक नवीन राष्ट्रीय धोरणाला अपेक्षित आहे.

**4) अध्ययनकर्त्याचे व्यक्तीस्वातंत्र्य जोपासनारा शिक्षक**

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात अध्ययनकर्त्याच्या व्यक्तीस्वातंत्र्याला महत्व देण्यात आला आहे. त्याच्या व्यक्ती स्वातंत्रयाचे आदर करुन विद्यार्थ्याच्या विकासासाठी आवश्यकता कृती करणारा, व्यक्तीस्वातंयाचा उपासक शिक्षक नवीन शैक्षणिक धोरणाला अपेक्षित आहे.

**5) नवीन अध्यापनतंत्रे, कौशल्य इत्यादीचा स्विकार**

जागतिक महामारीत कोव्हीड 19 पूर्वीचा शिक्षक आणि नंतरचा शिक्षक यामध्ये प्रचंड फरक आहे कोव्हीड 19 च्या कालावधीमध्ये संपूर्ण जगामध्ये ऑनलाईन शिक्षणाची संकल्पना स्विकारी, आत्मसात केली व त्याची अंमलबजावणी केली. भारतासारख्या देशामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात ऑनलाइन शिक्षणाची संकल्पना आज रुजलेली दिसून येते. येवू घातलेल्या नवीन शैक्षणिक धोरणात प्रामुख्याने माहितीतंत्रज्ञानाच्या आधारे शिक्षण आपण स्विकारले आहे. एज्युसॅट उपग्रहादवारे आणि व्हीडीओ कॉन्फरनसिंगदवारा शिक्षण देण्याची यंत्रना भारतासारख्या मोठया भूभागावर वसलेल्या देशासाठी उपयुक्त ठरणार आहे.

**6) क्रॉस् कल्चरींगचे आव्हान**

क्रॉस कल्चरींग म्हणजे वैद्यकशास्त्राचा विद्यार्थी संगणकशास्त्राचे शिक्षण घेवू शकतो, कला शाखेचा विद्यार्थी विज्ञानाचे शिक्षण घेवू शकतो म्हणून या प्रस्तावित आव्हानाला अलीकडील काळातील शिक्षकाना सामोरे जावे लागणार आहे.

या शिवाय संशोधन, व्यवसायभिमुख शिक्षण, दुरस्थ शिक्षण, प्रायोगिक शिक्षण, गुणवत्ता विकास इत्यादी अनेक आव्हानांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील शिक्षकाना सामोरे जावे लागणार आहे.

**7) एआर व व्हीआर तंत्रज्ञानादवारे अध्ययन – अध्यापन**

कोरोनाकाळानंतर प्राथमिक पासुन उच्च शिक्षणापर्यंत प्रचंड बदल झाल्याचे दिसून येते. शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन शिक्षण प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न होत आहे.नवीन शैक्षणिक धोरणानुसार आपले अध्ययन – अध्यापन अधिक रंजक व दर्जेदार करण्यासाठी एआरसोबतच एआर म्हणजेच ऑगमेंटेड रिऑलिटी व व्हीआर म्हणजेच व्हर्च्युअल रिऑलिटी हे तंत्रज्ञान वापरावे लागणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात आभासी प्रयोगशाळा तयार करण्याची शिफारस आहे. शिक्षक सद्या वापरत असलेल्या तंत्रज्ञानासोबतच त्यास नव्याने कृत्रिम बुध्दिमत्ता म्हणजेच 'एआय' चा वापर थोड्याफार प्रमाणात करावा लागणार आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेसोबतच संवर्धिन वास्तव व आभासी वास्तव हे येऊ घातलेले तंत्रज्ञान शिक्षकांनी नविन शैक्षणिक धोरणात वापरणे अपेक्षित आहे. एआर व व्हीआर या उदयोन्मुखी तंत्रज्ञानाने शिकण्याच्या व शिकवण्याच्या पध्दतीत नक्कीच भारतात क्रांती होणार आहे असे तज्ञांचे मत आहे.

आभासी प्रयोगशाळेच्या वापरासाठी सद्या शासकीय स्तरावर दिक्षा पोर्टल अंतर्गत कृतिकेंद्रित पाठ्यपुस्तके, घरच्याघरी शिका व प्रश्नपेढी उपलब्ध् करुन देण्यात आली आहे. तसेच स्वयंपोर्टलच्या माध्यमातून गुणवत्तेची हमी देण्यात आली आहे.

थोडक्यात शिक्षण अधिक गुणवत्तापुर्ण बनवण्यासाठी शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या गरजेवर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने भर दिला आहे. व हे सर्व बदल शिक्षकांनी आत्मसात करने अपेक्षित आहे.

**8) गुगलच्या तुलनेत गुरूजी सरस असल्याचे सिध्द करावे**

नवीन शैक्षणिक धोरणाची अमंलबजावणी करताना शिक्षकांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. शिक्षणातील तोचतोपणा टाळून गुरुजींनी आपले ज्ञान अद्ययावत करणे काळाची गरज आहे, अलीकडील काळात गुगल आणि गुरुजींची तुलना समाज करत असताना शिक्षकाने आपण गुगलपेक्षा वेगळे आहोत, सरस आहोत हे सिध्द करण्याची वेळ आली आहे. अजुनही विद्यार्थी, पालक, समाज, यांचा शिक्षकावर नितांत विश्वास आहे तो सार्थ ठरविणे ही भूमिका नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अपेक्षित आहे.

**संदर्भग्रंथ सुची**

1. भालबा विभूते – राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 – चिकित्सा मेहता पाब्लिशिंग हाऊस
2. Dr. G.H. Jain, Prof. Dr. T.Y. Chandwadkar and other –राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी बहुविद्याशाखीय शिक्षण अथर्व प्रकाशन
3. प्रा. डॉ. सुखदेव थोरात – नवीन शैक्षणिक धोरण 2020 अनुवाद: राजक्रांती वलसे, मारोती तेगमपुरे हरिती प्रकाशन
4. Ministry of Education – http//nationalawordstoteacher. Education.gov.in
5. NCERT- राष्ट्रीय शिक्षा नीती 2020
6. 06 Ministry of Education – https// www.education.gov.in
7. ncte- gov.in
8. Loksatta – http//www.loksatta.com
9. Wikipedia – http// en. wikipedia .org
10. Maharashtra Times – https//Marathi.indiatimes.com
11. वर्तमानपत्रे- दैनिक लोकसत्ता, सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, पुढारी